ISSN - 2279 - 0489
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
HALF YEARLY RESEARCH JOURNAL

# GENIUS

Volume - X Issue - I August - January - 2021-22

ENGLISH / MARATHI / HINDI PART - I

Peer Reviewed Refereed and
UGC Listed Journal No. 47100

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

IMPACT FACTOR / INDEXING
2019 - 6.631
www.sjifactor.com

❖ EDITOR ❖
Asst. Prof. Vinay Shankarrao Hatole
M.Sc (Maths), M.B.A. (Mktg.), M.B.A. (H.R.),
M.Drama (Acting), M.Drama (Prod. & Dir.), M.Ed.

❖ PUBLISHED BY ❖

Ajanta Prakashan
Aurangabad. (M.S.)

The information and views expressed and the research content published in this journal, the sole responsibility lies entirely with the author(s) and does not reflect the official opinion of the Editorial Board, Advisory Committee and the Editor in Chief of the Journal "GENIUS".
Owner, printer & publisher Vinay S. Hatole has printed this journal at Ajanta Computer and Printers, Jaisingpura, University Gate, Aurangabad, also Published the same at Aurangabad.

**Printed by**

Ajanta Computer, Near University Gate, Jaisingpura, Aurangabad. (M.S.)
**Printed by**

Ajanta Computer, Near University Gate, Jaisingpura, Aurangabad. (M.S.)
Cell No. : 9579260877, 9822620877 Ph. No. : (0240) 2400877

E-mail : ajanta5050@gmail.com, www.ajantaprakashan.com

**GENIUS - ISSN 2279 - 0489 - Impact Factor - 6.631** (www.sjifactor.com)

# EDITORIAL BOARD

**Dr. Nirmala S. Padmavat**
Assit. Prof. English Dept. Nutan Mahavidyalaya,
Selu, Dist: Parbhani

**Dr. Milind V. Bildikar**
Principal, B. P. Arts, S. M. A. Science
& K. K. C. Commerce College, Chalisgaon,
Dist.- Jalgaon.

**Dr. Ajay V. Kate**
Vice-Principal , IQAC Coordinatior &
Convener B. P. Arts, S. M. A. Science
& K. K. C. Commerce College, Chalisgaon,
Dist.- Jalgaon.

**Mr. S. D. Bhamare**
Head , Dept of Economics & Secretory,
B. P. Arts, S. M. A. Science & K. K. C. Commerce
College, Chalisgaon, Dist.- Jalgaon.

**Mr. P. V. Pagar**
B. P. Arts, S. M. A. Science & K. K. C. Commerce
College. Chalisgaon, Dist.- Jalgaon.

**Mr. A. R. Jadhav**
B. P. Arts, S. M. A. Science & K. K. C. Commerce
College, Chalisgaon, Dist.- Jalgaon.

**Mr. D. B. Patil**
B. P. Arts, S. M. A. Science & K. K. C. Commerce
College, Chalisgaon, Dist.- Jalgaon.

**Prof. Vijay Khade**
Dept. of English,
PVP College, Pravaranagar(Loni)
Tal- Rahata, Dist- Ahmednagar.



PUBLISHED BY

Ajanta Prakashan
Aurangabad. (M.S.)

# EDITORIAL BOARD

**Dr. S. Umesha**
Dept. Of Studies in Biotechnology, University of Mysore, Manasagangotri, Mysore, India.

**Dr. Tharanikkarasu K.**
Dept. Of Chemistry, Pondicherry University (Central University), Kalapet, Puducherry, India.

**Professor Kaiser Haq**
Dept. of English, University of Dhaka, Dhaka 1000, Bangladesh.

**Dr. Altaf Husain Pandit**
Dept. of Chemistry University of Kashmir, Kashmir, India.

**Prof. Avinashi Kapoor**
Head, Dept. Of Electronic Science, Dean, Faculty of Interdisciplinary Sciences, Chairman. Board of Research Studies, South Campus, University of Delhi, New Delhi, India.

**Prof. P. N. Gajjar**
Head, Dept. Of Physics, University School of Sciences, Gujarat University, Ahmedabad, India.

**Dr. Uday P. Dongare**
Head, Dept. Of Physical Education, Shivaji Art's, Commerce & Science College, Kannad, Aurangabad, India.

**Roderick McCulloch**
University of the Sunshine Coast, Locked Bag 4, Maroochydore DC, Queensland, 4558 Australia.

**Dr. K. B. Laghane**
Dean. Faculty of Management Science.
Dean. Faculty of Commerce (Dr. B.A.M.U.)
Head Commerce Dept., Vivekanad College, Samarth Nager, Aurangabad, India.

**Brian Schiff**
Brussels. Copenhagen, Madrid, Paris.

**Dr. Prashant M. Dolia**
Dept. Of Computer Science & Applications, Bhavnagar University, India.

**Dr. Nicholas Ioannides**
Senior Lecturer & Cisco Networking Academy Instructor, Faculty of Computing. North Campus, London Metropolitan University, 166-220 Holloway Road, London, N7 8DB, UK.

**Dr. Hanumanthappa J.**
Dept. Of Studies In Computer Science, University of Mysore, Manasagangotri, Mysore-570 006, Karnataka, India.

**Dr. Asharf Fetoh Eata**
College of Arts or Science Salmau Bin Adbul Aziz University, KAS.

**Dr. Kailas Thombre**
Research Guide, Dept .of Economics Deogiri College, Aurangabad, India.

**Dr. Isita Lahiri**
Dept. of Business Administration, University of Kalyani, Kalyani West Bengal.

# CONTENTS OF ENGLISH PART - I



| S. No. | Title & Author | Page No. |
|---|---|---|
| 1 | The Financial Nature of the Automobile Industry: A Study in the Context of Current Indian Perspectives<br>**Anil Kumar** | 1-4 |
| 2 | A Study to Awakening of Woman over Cyber Crime in India<br>**Arvind Navrang Singh**<br>**Dr. Anil Kumar** | 5-8 |
| 3 | A Critical Study to Patent law and TRIP'S Agreement under Indian Laws<br>**Neetu Sharma**<br>**Dr. Anil Kumar** | 9-13 |
| 4 | Uniform Civil Code: A Socio Legal Study in Reference to Indian Constitution<br>**Dr. Rinky Bharti**<br>**Dr. Anil Kumar** | 14-17 |
| 5 | The End of Innocence and Democracy in William Golding's *Lord of the Flies*<br>**Mr. Nitin Shankar Gawai** | 18-22 |
| 6 | An Analytic Study to Classification in Cyber Crime and Cyber Terrorism in India<br>**Arvind Navrang Singh**<br>**Dr. Anil Kumar** | 23-28 |
| 7 | Water, Sanitation, and Hygiene Service in Vaijapur Tehsil Dist. Aurangabad<br>**Mr. Ban K. S.**<br>**Dr. Hiwale S. D.** | 29-32 |
| 8 | A Critical Study on Indian Legal Regime on Patent System to be Harmonious with Trips Agreement<br>**Neetu Sharma**<br>**Dr. Anil Kumar** | 33-38 |
| 9 | Qualitative Evaluation of Pradhan Mantri Awaas Yojana (PMAY - G): A Case Study of Buldhana District in Maharashtra<br>**Dr. Kailas D. Landge** | 39-45 |

# CONTENTS OF ENGLISH PART - I



| S. No. | Title & Author | Page No. |
|---|---|---|
| 10 | Maritime Security Challenges to India<br>**Suneet Mitra Pandey** | 46-51 |
| 11 | Water - Sustainability Consciousness among Secondary Students in India<br>**Kolan Padmaja**<br>**Prof. C. Madhumathi** | 52-58 |
| 12 | Supporting Agricultural Business Play a Important Role in Economic Development in Shevgaon and Pathardi Tehsil<br>**Dr. D. G. Mane** | 59-61 |
| 13 | Shashi Tharoor's an Era of Darkness: Perspectives on History, Politics, Economic and Culture<br>**Satish Narsing Palve** | 62-65 |
| 14 | Gandhi's Concept of Gram Swaraj and it's Relevance in Contemporary Pris<br>**Nikhil Jaindra Borkar** | 66-71 |
| 15 | Relationship between Human Behaviour and Teaching - Learning Processes<br>**Dr. Mita Howladar** | 72-77 |
| 16 | Total Qality Management - The Art of Managing the Whole to Achieve Excellence<br>**Dr. Rajshree S. Rathod** | 78-82 |
| 17 | Demonetization in India: Impact on Banking Sector<br>**Dr. Sudhir Shridhar Linge**<br>**Dr. Sandeep Pandurang Petkar**<br>**Dr. Shailendrasingh V. Dikit** | 83-89 |
| 18 | Prediction of Total Number of Corona Patients Using Least Square Method<br>**Prof. Sandeep Kajabe**<br>**Prof. Vijay Shinde** | 90-92 |

VOLUME - X, ISSUE - I - AUGUST - JANUARY - 2021-22
GENIUS - ISSN 2279 - 0489 - IMPACT FACTOR - 6.631 (www.sjifactor.com)

# CONTENTS OF MARATHI PART - I



| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | संत नामदेव यांच्या अभंगातील सामाजिक विचार<br>डॉ. स्वाती व्यंकटराव पाटील | १-४ |
| २ | नव्वदोत्तरी कथात्म साहित्यातील वास्तव<br>प्रा. डॉ. संतोष चव्हाण<br>शिंदे सुनंदा सुंदरराव | ५-९ |
| ३ | प्रतीत्य समुत्पाद एक तथागतांचा दुख: मुक्तीचा शोध<br>चंद्रशेखर बलराम दहिवेले | १०-१५ |
| ४ | क्रांतीकारक विचारवंत : संत रोहिदास<br>शांतीलाल सांडू गायकवाड | १६-१७ |
| ५ | काया मातीच्या... समग्र सौंदर्यातून प्रखर मानवीमूल्य: विठ्ठल वाघांची जनककविता<br>डॉ. विशाखा संजय कांबळे | १८-२१ |
| ६ | भटक्या-विमुक्तांच्या आत्मकथनातील आर्थिक पार्श्वभूमी<br>डॉ. द्रौपदी पंदिलवाड | २२-२७ |
| ७ | संत तुकारामांच्या कार्याच्या फलनिष्पत्तीचा शोध<br>डॉ. हनुमंत मारोतीराव भोपाळे | २८-३३ |
| ८ | छत्रपती शिवाजी राजे यांचे स्त्री विषयक विचार<br>प्रा. डॉ. जी. ए. कन्हाळे | ३४-३७ |
| ९ | आर्थिक विकासातील आधारभुत संरचनेची भूमिका: एक चिंतन<br>प्रा. डॉ. परशुराम पाटील | ३८-४० |
| १० | संत एकनाथांच्या भारूडशैलीचे वेगळेपण<br>कृष्णा महादेव धर्मे | ४१-४६ |
| ११ | सेवासदन : स्त्री शिक्षणांच केंद्र<br>डॉ. कालिदास सुर्यवंशी<br>प्रा. भास्कर टेकाळे | ४७-४९ |
| १२ | कोविड-१९ भारतीय अर्थव्यवस्थेवर परिणाम<br>विजयसिंग भोमसिंग पवार<br>डॉ. प्रदीप घोरपडे | ५०-५३ |

# CONTENTS OF MARATHI PART - I



| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १३ | चिंतनातून परिदृढ होणारी कविता: गाव आणि शहराच्या मधोमध<br>डॉ. छाया हरिभाऊ कदम-पवार | ५४-५८ |
| १४ | शेतकरी आत्महत्येची कारणे (विशेष संदर्भ : अमरावती जिल्हा)<br>प्रा. डॉ. सुभाष के. पवार | ५९-६३ |

VOLUME - X, ISSUE - I - AUGUST - JANUARY - 2021-22
GENIUS - ISSN 2279 - 0489 - IMPACT FACTOR - 6.631 (www.sjifactor.com)

# CONTENTS OF HINDI PART - I



| अ.क्र. | लेख और लेखकका नाम | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | राजस्थान में पर्यटन उद्योग एवं अभिगम्यता<br>डॉ. अनिल कुमार जाटावत | १-६ |

VOLUME - X, ISSUE - I - AUGUST - JANUARY - 2021-22
GENIUS - ISSN - 2279 - 0489 - IMPACT FACTOR - 6.631 (www.sjifactor.com)

# १४. शेतकरी आत्महत्येची कारणे (विशेष संदर्भ : अमरावती जिल्हा)

**प्रा. डॉ. सुभाष के. पवार**
सहयोगी प्राध्यापक, स्व. दत्तात्रय पुसदकर कला महाविद्यालय, नांदगाव पेठ, जि. अमरावती.

**प्रस्तावना**

भारत हा कृषीप्रधान देश आहे. भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा म्हणजे शेती होय. शेती हे भारतातील सर्वात मोठे असंघटीत क्षेत्र आहे. यातून लोकांना अन्न मिळते. तर उद्योगधंद्यांना कच्चा माल मिळतो. 2011 च्या जणगणनेनुसार भारतातील 52 टक्के लोकांना यातून रोजगार प्राप्त होतो. 2009 – 10 च्या दरडोई उत्पन्नामध्ये ;ळक्च्द्ध शेतीचा वाटा 16.09 टक्के इतका होता. 2010–11 च्या निर्यातीमध्ये शेतीचा वाटा 10.05 टक्के इतका होता.[1] दरडोई उत्पन्नामधील शेतीची टक्केवारी कमी होत असली तरी ही आज ही शेती हेच दरडोई उत्पन्नातील सर्वात मोठे क्षेत्र आहे. कमी वृध्दी दर आणि देशातील विविध भागातील शेतीतील संकटामूळे देशावर अन्नधान्य सुरक्षिततेवर तर संकट आलेच आहे, सोबतच आर्थिक वृध्दीवर सुध्दा संकट आले आहे. त्यांचा परिणाम सामाजिक घटकावर पडलेला आहे.

भारतीय कृषीक्षेत्रासमोर अनेक समस्या उभ्या आहेत. त्यात शेतक–यांची आत्महत्या ही एक प्रमुख समस्या आहे. शेतक–यांची आत्महत्या भारतीय अर्थव्यवस्थेसमोरील एक ज्वलंत समस्या आहे. 1991 च्या जागतिकीकरणामूळे ही समस्या तीव्र स्वरुप धारण करीत आहे. शेतक–यांच्या आत्महत्या होण्यास अनेक मानवनिर्मित व नैसर्गिक कारणे जबाबदार आहेत. मात्र यात मानवनिर्मित कारणेच जास्त जबाबदार असल्याचे दिसून येते. कारण विकासाच्या प्रक्रियेत शेतीक्षेत्रास योग्य असा न्याय मिळालां नाही. तसेच आर्थिक विकासाचा वेग वाढत असतांना त्याचा पर्यायरणावर होणारा परिणाम लक्षात घेतला नाही. त्यामळे शेतीक्षेत्रात अनुकूल असणारे पर्यावरण हळूहळू बदलत गेले. आणि याचाच परिणाम शेती क्षेत्रावर घडुन येवू लागला. व त्याची फलनिष्पती शेतक–याच्या आत्महत्येच्या रुपाने आली आहे. ही फक्त पर्यावरण बदलाच्या सुरुवातीची फलनिष्पती आहे. पर्यावरण बदलास जबाबदार असणा–या घटकांचा अभ्यास केला गेला नाही ती त्यामुळे अखिल मानव जातीस एक दिवस विनाशाच्या रुपात परतफेड करावी लागेल हे सत्य आहे.

**अध्ययन विषयाची उदिष्टये**

- आत्महत्येसाठी जबाबदार असणा–या कारणांचा अभ्यास करणे.

**संशोधन पध्दती**

सदरील लघुशोध निबंधासाठी संशोधन पध्दतीतील प्राथमिक व द्वितीय सामग्रीचा वापर करण्यात आला आहे. अमरावती जिल्हयातील एकुण 50 शेतकरी आत्महत्या करणा–या कुटुंयातील उत्तरदात्यांची निवड करुन त्यांची मुलाखत घेण्यात आली. प्राथमिक सामग्रीत मुलाखत अनुसूचीचा वापर करण्यात आला आहे. तसेच द्वितीय सामग्रीत विविध ग्रंथ, मासिके, वर्तमान पत्रे इत्यादी साहित्याचा वापर करुन तथ्य संकलन करण्यात आले आहे.

सारणी क्र. 1

सन 2001 ते 2011 पर्यंत झालेल्या पात्र शेतकरी आत्महत्याबाबत तालुकानिहाय दर्शविणारी सारणी

| अ.क्र. | तालुका | तालुकानिहाय पात्र प्रकरणाची संख्या |
|---|---|---|
| 1 | अमरावती | 33 |
| 2 | भातकुली | 29 |
| 3 | नांदगाव खंडेश्वर | 43 |
| 4 | चांदुररेल्वे | 21 |
| 5 | धामणगाव रेल्वे | 32 |
| 6 | तिवसा | 28 |
| 7 | मोर्शी | 50 |
| 8 | वरुड | 37 |
| 9 | अचलपूर | 27 |
| 10 | चांदुर बाजार | 70 |
| 11 | दर्यापूर | 30 |
| 12 | अंजनगाव | 51 |
| 13 | धारणी | 04 |
| 14 | चिखलदरा | 01 |
| 15 | एकूण | 455 |

(स्त्रोतः अमरावती विभागीय कार्यालय, आपत्ती व्यवस्थपन कार्यालय)

सारणी क्र. 2

शेतक-यांच्या आत्महत्याबाबत वर्षनिहाय पात्र व अपात्र शेतकरी आत्महत्येचा तपशिल

| अ.क्र. | इसवी सन | पात्र शेतकरी आत्महत्या | अपात्र शेतकरी आत्महत्या | एकूण शेतकरी आत्महत्या |
|---|---|---|---|---|
| 1 | 2001 | 07 | 04 | 11 |
| 2 | 2002 | 16 | 04 | 20 |
| 3 | 2003 | 22 | 19 | 41 |
| 4 | 2004 | 49 | 51 | 100 |
| 5 | 2005 | 59 | 43 | 102 |
| 6 | 2006 | 78 | 191 | 269 |
| 7 | 2007 | 74 | 190 | 264 |
| 8 | 2008 | 65 | 199 | 264 |
| 9 | 2009 | 43 | 213 | 256 |
| 10 | 2010 | 25 | 185 | 210 |
| 11 | 2011 | 78 | 164 | 242 |
| 12 | 2012 | 53 | 149 | 201 |

(स्त्रोतः अमरावती विभागीय कार्यालय, आपत्ती व्यवस्थपन कार्यालय)

शेतकरी आत्महत्येची कारणे

1. कर्जबाजारीपणा : एखदा बँकेकडून कर्ज घेतलेला शेतकरी परत करत नाही तोपर्यंत त्याला दुस–या बँका कर्ज देत नाही. अशा वेळेस पुर्वीचे कर्ज फेडायला पैसा नसलेला शेतकरी नवीन पीक घेण्यासाठी आवश्यक असणा–या पैशासाठी खाजगी सावकाराकडे वळतो. खाजगी सावकार हे अब्जाच्या सव्वा व्याजदराने कर्ज देतात. शेतक–याला हे व्याजदर परवडणारे नसतात. अनेक वर्ष हे कर्ज फेडून सुध्दा शेतकरी हा त्या कर्जाचे व्याजच फेडत असतो. मुद्दल तर तसीच राहते. एखदा कर्ज थकली कि त्या शेतक–याचा कर्जबाजारीपणा वाढत जातो. या कर्जातून सुटका होणे शक्य नसते. शेवटी कर्ज फेडायच्या पलीकडे जाते तेव्हा सावकार जमीन ताब्यात घेतात आणि शेतक–याला एकतर मोलमजूरी करणे भाग पडते. यातूनच नैराश्य येवून शेतकरी मोठया प्रमाणावर आत्महत्या करतात. अनेक शेतक–यांच्या आत्महत्येचे मुख्य कारण हे कर्जबाजारीपणा हेच आहे.

2. हवामानातील बदल: भारतीय शेती मोठया प्रमाणात पावसाच्या लहरीवर अवलंबून असते. भारतीय शेतीमध्ये सिंचनाखाली येणा–या जमीनीचे प्रमाण वाढत असले तरी आणखीनही बरेच क्षेत्र हे फक्त पावसाच्या पाण्यावर पिकते. यामुळे ही शेती बेभरवश्याच्या व्यवसाय वाटते. कारण पाऊस हा कधी कमी तर कधी जास्त प्रमाणात पडतो. तसेच हा पाऊस जर वेळी अवेळी पडला तर आलेल्या शेतीमालाचे सुध्दा नुकसान होते. तसेच भारतीय शेतीवर हवामानातील बदल ही मोठया प्रमाणात प्रभाव पाडतो. पीकांना आवश्यक असणा–या वातावरणात जर एकदम बदल झाला तर पीकांचे नुकसान होते. जसे की अचानक थंडी पडणे, धुके पडणे यामूळे शेतात चांगले आलेले पीक सुध्दा खराब होवु शकते. यामूळे हवामानातील थोडयाफार बदलामूळे सुध्दा शेतक–यांच्या हाती तोंडात आलेला घास निसटून जातो. यातून सुध्दा शेतकरी आत्महत्येस प्रवृत्त होतो.

3. बाजारपेठेत मिळणारी मालाची किंमत: अनेक समस्यांना तोंड देत जेव्हा शेतातला माल तयार होतो आणि बाजारपेठेत येतो तेव्हा त्याला योग्य ती किंमत मिळत नाही. कधी चांगल्या हवामानामूळे प्रचंड पिके आली तर बाजारपेठेत माल जास्त झाल्याने भाव पडतात. शेतीमाल महाग पडला तरी जास्तीचा पैसा शेतक–यांच्या हातात पडत नाही. भारतात अद्यापही शेतीमालाचा व्यापार मोठया प्रमाणात मध्यस्थाच्या हातात आहे. हंगामात ते शेतक–याकडून कमी किंमतीत माल खरेदी करतात, त्याचे साठे करतात. हंगाम संपल्यावर तो अधिक किंमतीत विकतात. दलालीमूळे ग्राहकाला शेतीमाल महाग पडला तरी जास्तीचा पैसा शेतक–यांच्या हातात पडत नाही. शेतक–यांच्या आत्महत्येचे महत्वाचे कारण आहे.

4. सेजसारखे प्रकल्पाचे वाढते प्रमाण: भारतात जुलै 2007 पर्यंत सेजचे 262 प्रस्तावना स्विकृती देण्यात आली आहे. अशा या प्रकल्पामध्ये मोठया प्रमाणात जमीनीची आवश्यकता असते. त्यामुळे शेतक–याकडून ही जमीन विकत घेतली जाते. यामध्ये जर ती जमीन सुपिक असेल तर त्यातून येणारे उत्पादन बंद केल्या जाते. तसेच शेतक–याकडून जमीन घेतांना वेगळे भाव ठरवले जाते. मात्र नंतर त्यांना योग्य मोबदला मिळत नाही. तसेच त्यांना त्यांच्या जमीनीच्या बदल्यात जर जमीन दिली जात असेल तर ती सुपिक जमीनीच्या बदल्यात नापीक किंवा कोरडवाहु जमीन दिल्या जाते. यातून त्यांच्या उत्पन्नात घट निर्माण

होते. तसेच शेतक–यांने जमीन देण्यास नकार दिला तर ती जमीन त्यांच्याकडुन बळजबरीने किंवा वेगळया मार्गाने मिळविण्याचा प्रयत्न केला जातो. यामूळे सरकारच्या धोरणामूळे व सेज सारख्या प्रकल्पाचा त्रासाला कंटाळून शेतकरी आत्महत्या करतात.

5. शेतक–यांचा अज्ञानपणा: शासन ज्या योजना राबवते त्या योजनांचे शेतक–याला परिपूर्ण ज्ञान नसते. म्हणून त्यांचा फायदा सावकार, व्यापारी, आडत, दुकानदार लोक अज्ञानाचा फायदा घेतात. त्यास शेतकरी बळी पडतो. पण या सर्वांचा परिणाम शेतक–यांच्या आत्महत्या वाढण्यात होत आहे.

6. दारिद्रय: अठरा विश्व दारिद्रय हे शेतक–यांच्या पदरी असते. त्याची गणना दारिद्रयात केली जाते. त्यांची आर्थिक स्थिती नाजूक असते. त्यात थोडीही ढवळाढवळ झाली तर त्यांचा फटका त्याला बसतो. ग्रामीण भागातील शेतक–यांचे दारिद्रय त्याला जीवनाबदल उदासीन व बेजबाबदार बनविते. म्हणून तो आत्महत्येस प्रवृत्त होते.

7. सरकारी धोरण: शेतक–यावरील आत्महत्येचे संकट हे स्वातंत्रप्राप्तीनंतरच्या सरकारी धोरणामध्ये आहे. स्वातंत्रयानंतर भारताने जे शेतीविषयक धोरण राबविले ते अप्रत्यक्षपणे पण व्यापक स्वरुपात आत्महत्येस जबाबदार आहेत. गेल्या 70 वर्षात शेतीसंबंधीच्या प्रश्नांना अग्रक्रम दिला असता तर आज हे संकट आले नसते.

8. शेतीविषयक राष्ट्रीय धोरणांचा अभाव: शेतीसाठी राष्ट्रीय धोरण नाही. उलट निर्यातीवर मर्यादा व आयातीला प्रोत्साहन आहे. शेतीविषयक कायदे, पीक विमा, बीजविषयक धोरण, कर्जपुरवठा यामध्ये नव्या सुधारणा घडवून आणण्यात असे सरकारला वाटत नाही. सरकारचे धोरण व शेतक–यांचे मरण अशी स्थिती निर्माण झाल्यामूळे शेतकरी आत्महत्या करतो आहे.

9. नियोजनाचा अभाव: शेती म्हणजे उपजिवीकेचे साधन आहे. अशी आपल्या समाजाची संकुचित धारणा आहे. कोणते पीक कधी घ्यावे? माल कुणाकडे विक्री करावा? खर्च व उत्पन्न यांचा हिशोब नसणे, धर्मावर, आरोग्यावर किती खर्च करावा? याचा ताळमेळ शेतक–याकडे नसतो. म्हणून शेतकरी आत्महत्या करतात.

10. इतर कारणे: संयुक्त कुटुंब पध्दतीचा –हास, असाध्य आजार, व्यसनाधिता, असंघटितपणा, प्रक्रिया उद्योगाचा अभाव, गावपातळीवरील राजकारण, अकार्यक्षम कृषी उत्पन्न बाजार समित्या शेतक–यांचे परावलंबित्व हे देखिल शेतकरी आत्महत्येस कारणीभूत घटक आहे.

## संदर्भ सुची

1. P.k. Dhar, Indian Economy its Growing Dimensions Kalyani Publication, Ludhina [2011]
2. Government of India, Ministry of Agriculture, Department of Agriculture & Co-O[ertion Directorate pf Economics and Statistics state of Indian Agriculture. 2011-12
3. Mr. Surjit Mishra, Farmers Suicides is Maharashtra, Economic and Political Weekly 22-28 April 2006,

4. Reports of National Crime Records Berao, [NCRB] Accidental Deaths and Suicide in India, 1995 rs 2011, Ministry of Home affairs, Government of India.
5. Sector Officers, department of disaster Management [Farmer suicide], New Administrative building, Government of Maharashtra Mumbai.
6. दुर्खिम एमिल, (अनुवाद 2008), आत्महत्या समाजशास्त्रीय अध्ययन, रामकिसन गुप्ता, लक्ष्मीनगर दिली.
7. दुर्खिम एमिल, कित्ता पृष्ठ क्र. 125
8. जिल्हा आर्थिक व सामाजिक समालोचन अमरावती. 2002–03
9. डॉ. विनायक शिदे, शेतकरी आत्महत्या समस्या आणि उपाय,सूर्यमुद्रा प्रकाशन, नांदेड.
10. डॉ. संभाजी काळे व डॉ. विलास खंदारे, शेतक–यांची आत्महत्या (वास्तव आणि उपाय), अर्थव पब्लिकेशन, धुळे.
11. लांजेवार नरेद्र, शेतक–यांच्या आतमहत्या, चितंन आणि उपाय, सुमेरु प्रकाशन, डी– 6, राजहंस सोसायटी, डोबीवली.
12. दांडेकर अजय, शेतक–यांच्या आत्महत्या व ग्रामीण कंगालीकरण, समाजप्रबोधन पत्रिका, बेळगाव.
13. मराठी विश्वकोश खंड 4, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश खंड 4